# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

**दिनांक 05/08/2015 (दि.28/07/2015 रोजीची तहकुब सभा (का.प.क्र.4) रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक 05 ऑगस्ट 2015 रोजी (दि.28/7/15 ची तहकूब सभा-का.प.क्र .4) मा.सभापती श्री.दिलीप थोरात यांचे अध्यक्षतेखाली स्थायी समितीची सभा मुख्य कार्यालयातील मलीक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी 11.15 वा.वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार, नगरसचिव, श्री.दिलीप सुर्यवंशी व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

01. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
02. स.स.श्री.मोहन धन्नुलाल मेघावाले
03. स.स.श्री.नितीन रमन चित्ते
04. स.स.श्री.रावसाहेब राधाकिसन आमले
05. स.स.श्री.कमलाकर शामराव जगताप
06. स.स.श्री.गजानन भानुदास मनगटे
07. स.स.श्री.मकरंद माधवराव कुलकर्णी
08. स.स.श्री.विकास प्रकाश एडके
09. स.स.श्रीमती कमल रामचंद्र नरोटे
10. स.स.श्रीमती ज्योती सुभाष पिंजरकर
11. स.स.श्री.खान इरशाद इब्राहीम
12. स.स.श्री.नाईकवाडी अब्दुल रहीम शेख
13. स.स.श्रीमती ज्योती राजाराम मोरे
14. स.स.श्रीमती रेश्मा अशपाक कुरैशी

श्री.गजानन बारवाल :शहरात 15 दिवसापासून खाजगी व घाटी दवाखान्यात ताप खोकल्याचे रूग्ण आढळून येत आहे.यासाठी काय उपाययोजना केली.

आरोग्य वैद्य.अधिकारी :पावसाळा सुरू असून दोन तिन दिवसापासून पाऊस चालू आहे साथीच्या रोगाकरीता पोषक वातावरण निर्माण झाले.अनेक रूग्ण आढळून येत आहे त्यावर प्रतिबंधक तयारी म्हणून 24 तास साथ रोग नियत्रंण कक्ष स्थापन केले.माहिती पेपरला दिली. दोन वैद्य.अधिकारी नेमले. संशयीत तापाचा व डेग्युंचा रूग्णासाठी शोध घेण्यासाठी टिम तयार केली ते जागेवर जाऊन तपासणी करतात.प्रभाग निहाय नियंत्रण वैद्यकीय अधिकारी नियुक्त केले.त्या अंतर्गत जे आरोग्य केंद्र येतील तेथे अधिकारी आढावा घेत असून या आरोग्य केंद्रात अंतर्गत व खाजगी प्रयोग शाळा मधून किती तापाचे रूग्ण माहिती घेत आहोत.जेथे संशयीत रूग्ण तेथे आरोग्य केंद्रांच्या मार्फत टीम पोहचत आहे.30 तारखेपासून धडक मोहिम राबवित आहोत वार्ड ई मध्ये तापाचे जास्त रूग्ण आढळले घरोघरी जाऊन तपासणी करतो आहोत 137 वर्कस पाठविले 217 घरामध्ये डास अडी आढळून आली.8941 घरामध्ये अबेट टीटमेंन्ट केली घरामध्ये कन्टेन्स रिकामे केले 33 संशयीत डेग्युचे रूग्ण होते जुलै महिण्यात 04 रूग्ण आढळले 24 जुलैनंतर एकही रूग्ण आढळले नाही. स्वाईन फ्यू चे रूग्ण आढळले नाही.

श्री.गजानन बारवाल :औषध फवारणी होत नाही अबेट पाहिजे तसे वापरत नाही फवारणी होत नाही.डेग्युने,स्वाईन फ्यूचा फैलाव होत आहे.स्वच्छता व फवारणी होत नाही अनेक तक्रारी प्राप्त आहे

आरोग्य वैद्य.अधि. :24 तास नियंत्रण कक्ष चालू आहे खाजगीतील रूग्णाचे माहितीसाठी नियंत्रण कक्षाचे इ-मेल आय डी दिला तक्रारीची माहिती घेवून सांगण्यात येईल.

श्री.मोहन मेघावाले :24 तासात किती तक्रारी येतात फवारणी व्हावी. एजन्सी काम करीत नाही यापुर्वीच यंत्रणा कार्यान्वित करायला पाहिजे. एजन्सी काम करीत नसेल तर ब्लॅक लिस्ट करावे.मनपाचे संबधीत अधिकारी लक्ष देत नाही आम्ही चर्चा करतो तेच ते उत्तर मिळते.गंभीरतेने घेतले जावे.

श्रीमती कमल नरोटे :औषध व धूर फवारणी होत नाही. कचरा उचलल्यानंतर पावडर टाकत नाही त्यामुळे डास ,मच्छर होत आहे.

श्री.कमलाकर जगताप :माझ्या वार्डात 50 टक्के तापेचे रूग्ण आढळून येतात फवारणी होत नाही. प्रश्न उपस्थित केल्यास गोलमोल उत्तरे मिळतात.

मा.सभापती :या पुर्वीही प्रश्न उपस्थित केले होते त्याची काळजी घेतली नाही या चौकशी केली माहिती दयावी.

श्री.मकरंद कुलकर्णी :चर्चा करतो ठोस कार्यवाही होत नाही. एजन्सी काम करीत नसेल ठेका रद्य करावा त्यांना ब्लॅक लिस्ट करावे दुसरे एजन्सीला काम देणे बाबत ठोस निर्णय घ्यावा.

आरोग्य वैद्य.अधिकारी :ठेंबरे एजन्सीला ब्लॅकलिस्ट केले.एन-2 भागात काय कार्यवाही केली माहिती घेवून सांगण्यात येईल.निवडणुक वाईज कृती आराखडा तयार केला.सर्व सदस्यांना त्याची प्रत दिली.

मा.सभापती :एका एजन्सीवर कार्यवही केली इतर एजन्सीवर काय कार्यवाही केली.

आरोग्य वैद्य.अधिकारी :दीड वर्षापासून त्यांना पेमेन्ट दिले नाही चौकशी केली आहे नवीन टेंडर प्रक्रिया थांबविली आहे मनपाकडून काम करता येईल हे याचा विचार होत आहे.

मा.सभापती :पेमेंन्ट दिले नाही म्हणून काम करीत नसतील तर या काळातील पेमेन्ट देणे बाबत काय कार्यवाही करणार आहेत.

आरोग्य वैद्य.अधि. :पेमेन्टचे व्हॉवचर पास केले लेखा विभागात आहे.औषध घेणे कम्पसरी केले. 1 लक्षचे औषध येणे अपेक्षीत आहे.लेंबरला पेमेंन्ट देणे अपेक्षीत असते. तरी एजन्सी काम करीत आहे.पेमेन्ट देणे आवश्यक आहे औषधी विकत घ्यावी लागतात.

श्री.मकरंद कुलकर्णी :तीन महिण्यात कुठे काम केले. काम केले नसेल तर पेमेंन्ट देणार काय ?

श्री.कमलाकर जगताप :औषध फवारणी तीन एजन्सीज आहे ते काम करीत कनाही त्यांनो काळया यादीत टाकावे.

श्री.गजानन बारवाल :एजन्सीला पेमेंन्ट देऊ नये पुढील कार्यवाही करावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :फवारणीच्या वेळेस एजन्सीचे लोक भेटत नाही फवारणी केली की नाही सदस्यांची सही घेत नाही.नागरीकांना चांगले आरोग्य देणे ही मनपाची जबाबदारी आहे पाण्यात औषधी टाकतात की नाही. साफसफाई होत नाही 2-2 वर्षापासून कर्मचा-यांना पगार नाही असे ते कर्मचारी सांगतात.महिला बचत गटास कन्टीन्यूव करावे त्यांना काम दयावे पगार केंव्हा करायला पाहिजे अटी शर्ती मध्ये सर्व असावे.कचरा उचलून नेण्यासाठी हातगाडया नाही. सुका ओला कचरा वेगळा होत नाही या सर्व गोष्टीकडे संबधीत विभागाने लक्ष देणे आवश्यक आहे.

मा.सभापती :फवारणी व साफसफाई संदर्भात तक्रारी विचारात घेवून ज्या एजन्सी काम करीत नाही त्या संदर्भात चौकशी करून पुढील सभेत अहवाल सादर करावा.

श्री.विकास एडके :सदस्यांना माहिती दिली असे म्हटले मला दिली नाही.

मा.सभापती :फवारणी ज्या भागात होते त्यावेळी तेथील स.सदस्यांना माहिती दिली जावी.जे प्रश्न उपस्थित होतात त्यांची माहिती सभेच्या पुर्वी सदस्यांना दयावी.

श्री.अब्दुल नाईकवाडी :बचत गटांना साफसफाईचे देतो परंतु वेळेवर पेमेन्ट दिले जात नाही त्यामुळे कामगारांना पगार मिळत नाही.

कक्ष प्रमुख,घनकचरा :सिडकोच्या ठेकेदाराकडील लेबर यांना बचत गटाच्या मार्फत काम दिलेले होते त्यात 20-24 लेबर एक बचत गटामध्ये आहे.

श्री.अब्दुल नाईकवाडी :महिला बचत गटातील महिला काम करीत नाही दुस-यांना कामावर लावतात.त्यांनी स्वत: काम केले पाहिजे.

कक्ष प्रमुख घनकचरा :सिडकोचे लेबरांना समावून घेणेसाठी व त्यांना काम मिळावे यासाठी बचत गटाच्या माध्यमातून काम दिले त्यांचे पध्दतीने बचतगट केलेला आहे त्यात महिला व पुरूष आहे.

श्री.मोहन मेघावाले :सिडको प्रशासन चांगले काम करीत असे मनपाचे कर्मचारी काम होत नाही.पावडर टाकले जात नाही.महिला बचत गटाला सक्षम करण्यासाठी हे लेबर दिले हे लेबर सक्षमपणे काम करीत नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :महिला बचत गटात पुरूष मजूर असू शकतात का काम तेच आहे नावापुरते बचत गटास दिले तेच लोक काम करतात.

श्री.मोहन मेघावाले :सिडकोचे मजूर होते तेच काम करतात का ?

श्री.नितीन चित्ते :श्री.नागरे यांचे वार्डात डेग्यूचे दोन रूग्ण होते बचत गटास काम दिले लेबरांना पगार देत नाही.बचत गटाचे पगार देणेसाठी प्रोसेस सोपी करावी त्यांना पेमेंन्ट लवकर मिळावे.

कक्ष प्रमुख घनकचरा :बचत गटाचे अध्यक्ष हजेरी पाठवून वार्ड स्वच्छता निरीक्षक तपासणी करतात व्हावचर होऊन वार्ड अधिकारी हे कर्मचा-यांचे ईएस,पीएफ कपात होतात की नाही तपासणी करतात त्यानंतर घनकचरा व्यवस्थापन ,लेखा विभागाकडून तपासणी होऊन मा.आयुक्ताच्या सहीसाठी जाते त्यानंतर कार्यवाही होते.

मा.सभापती :प्रत्येक महिण्याला बील का दिले जात नाही. ही अत्यावश्यक सेवा आहे. आयुक्तापर्यत जाण्यास किती वेळ लागतो.

कक्ष प्रमुख घनकचरा :आमच्या विभागाकडून एक दिवसात लेखा विभागाकडे बील जाते पुढे किती वेळ लागतो माहित नाही.

मा.सभापती :बचत गटाचे बील वेळेवर दयावे त्या कर्मचा-यांना वेळेवर पगार व्हावा यासाठी प्रशासनाने दर महिण्याला वेळेवर कार्यवाही करावी.

**विषय क्र. 05 :**

प्रस्ताव सादर करण्यांत येतो की,दि.19/07/2014 रोजी संपन्न झालेल्या मा.स्थायी समितीने पारीत केलेला ठराव क्र.27 अन्वये महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या वर्ग-3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना कार्यालयीन आदेश जा.क्र.मनपा/आस्था-1/2015/137. दि.10/02/2015 रोजीच्या आदेशान्वये दि.01/12/2014 ते दि.29/04/2015 पर्यंत तात्पुरती नियुक्ती देण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत मनपा आस्थापनेवरील वर्ग-3 संवर्गात खालील कर्मचारी कार्यरत आहे.

| अ. क्र. | कर्मचाऱ्याचे नांव | पदनाम | कार्यरत विभाग | दैनिक वेतन |
|---|---|---|---|---|
| १. | गजानन आढाव | स्वच्छता निरीक्षक | आरोग्य विभाग | रु.४३०/- |
| २. | संजय महादू नंदन | पशुधन पर्यवेक्षक | प्राणी संग्राहलय विभाग | रु.४३०/- |
| ३. | राहूल नटवरलाल पटेल | मिश्रक | आरोग्य विभाग | रु.४३०/- |
| ४. | दत्ता सरोदे | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांधकाम विभाग | रु.४३०/- |
| ५. | राजू सुरडकर | कनिष्ठ लिपीक | इमारती व उद्यान बांधकाम विभाग | रु.४३०/- |
| ६. | अरूण गुजलेकर | कनिष्ठ लिपीक | घरकुल कक्ष | रु.४३०/- |
| ७. | सय्यदा अफजलुन्नीसा नहेरी | कनिष्ठ लिपीक | मालमत्ता विभाग | रु.४३०/- |
| ८. | शफीक अहेमद | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-अ कार्यालय | रु.४३०/- |
| ९. | कृष्णा ठोकळ | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ब कार्यालय | रु.४३०/- |
| १०. | प्रभु लक्ष्मण चव्हाण | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-क कार्यालय | रु.४३०/- |
| ११. | मो.मुसा मो.याकुब कुरैशी | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड-क कार्यालय | रु.४३०/- |
| १२. | माधुरी शेंदूरकर | कनिष्ठ लिपीक | वार्ड-ड कार्यालय | रु.४३०/- |
| १३. | अखिल उर्र रहेमान | कनिष्ठ लिपीक | वार्ड-इ कार्यालय | रु.४३०/- |
| १४. | विजय पाटील | कनिष्ठ लिपीक | वार्ड-फ कार्यालय | रु.४३०/- |
| १५. | विमल चोखाजी साठे | कनिष्ठ लिपीक | विद्युत(ब/क)विभाग | रु.४३०/- |
| १६. | राजेश पाटील | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता-ड कार्यालय | रु.४३०/- |
| १७. | राजेश पगारे | कनिष्ठ लिपीक | वॉर्ड अभियंता-ड कार्यालय | रु.४३०/- |
| १८. | विजय हिवराळे | कनिष्ठ लिपीक | शहर अभियंता विभाग | रु.४३०/- |
| १९. | इकबाल जावेद रज्जाक | कनिष्ठ लिपीक | संगणक विभाग | रु.४३०/- |
| २०. | आनंद खरात | कनिष्ठ लिपीक | लेखा विभाग | रु.४३०/- |
| २१. | मुक्तेश्वर लोखंडे | कनिष्ठ लिपीक | कार्यकारी अभियंता (अ/ड) विभाग | रु.४३०/- |
| २२. | भारती जगताप | कनिष्ठ लिपीक | जनसंपर्क विभाग | रु.४३०/- |
| २३. | विनोद साळवे | कनिष्ठ लिपीक | जलतरण विभाग | रु.४३०/- |
| २४. | मिलिंद विठ्ठल गायकवाड | कनिष्ठ लिपीक | रस्ते,इमारती,उद्यान (वॉर्ड-अ) | रु.४३०/- |
| २५. | अफसर सिद्दीकी | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.४३०/- |
| २६. | संगिता थोरात | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.४३०/- |
| २७. | सुभाष धांडे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.४३०/- |
| २८. | बी.के.गायकवाड | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.४३०/- |
| २९. | विनोद वासेकर | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.४३०/- |
| ३०. | अलका नारायण बोरसे | कनिष्ठ लिपीक | नगर सचिव विभाग | रु.४३०/- |
| ३१. | अशोक किसनराव जाधव | कनिष्ठ लिपीक | पाणी पुरवठा (ई/फ) विभाग | रु.४३०/- |
| ३२. | रावसाहेब जावळे | कनिष्ठ लिपीक | प्राणी संग्रहालय | रु.४३०/- |
| ३३. | शेख महेबूब हुसेन | कनिष्ठ लिपीक | आरोग्य विभाग | रु.४३०/- |
| ३४. | अर्चना निकाळजे | संगणक ऑपरेटर | लेखा परीक्षण विभाग | रु.४३०/- |
| ३५. | शेख रियाज शेख मुजीबोद्दीन | संगणक ऑपरेटर | संगणक विभाग | रु.४३०/- |
| ३६. | जयश्री झाल्टे | संगणक ऑपरेटर | बीओटी विभाग | रु.४३०/- |
| ३७. | पद्माकर जाधव | डार्करूम सहाय्यक | आरोग्य विभाग | रु.४३०/- |
| ३८. | आरेफ खान मसुद खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३९. | भगीरथ जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४०. | हरिश्चंद्र सोनवणे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४१. | शेख फईम शेख बशीरोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४२. | मिलिंद घाटे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४३. | शेख रऊफ शेख माणिक | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४४. | महंमद याहया खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४५. | नजीर खान पठाण | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४६. | जगदीश गायकवाड | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४७. | प्रभु पवार | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४८. | रमेश सिरसाठ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ४९. | महादेव मिसाळ | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ५०. | शेख निजाम शेख दगडू | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ५१. | रंगनाथ बकले | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ५२. | गुलाम रसुल खान | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ५३. | रविंद्र पाटील | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ५४. | अरूण बोडखे | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ५५. | सय्यद फरिदोद्दीन | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ५६. | सतिश जाधव | वाहन चालक | यांत्रिकी विभाग | रु.४३०/- |
| ५७. | शेख जावेद शेख अमजद | देखरेख करण्यासाठी | बांधकाम-१ विभाग | रु.४३०/- |
| ५८. | सर्वेश नांद्रेकर | देखरेख करण्यासाठी | बांधकाम-१ विभाग | रु.४३०/- |
| ५९. | मो.रफीयोद्दीन | चित्रपट चालक | पशुधन विकास विभाग | रु.४३०/- |
| ६०. | रमेश शिंदे | प्लँट ऑपरेटर | पाणी पुरवठा-१ विभाग | रु.४३०/- |

कार्यालयीन आदेश दि.10/2/2015 मध्ये नमूद केल्यानुसार लिपीक वर्ग कर्मचाऱ्यांना पुढील मुदतवाढ देण्यापूर्वी संबंधित कर्मचारी हे संगणकावर काम करण्यास सक्षम असल्याचे प्रमाणपत्र विभाग/शाखा प्रमुख यांनी सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तथापि,जे लिपीक वर्ग कर्मचारी संगणकावर काम करण्यास सद्यस्थितीत सक्षम नसल्यास त्यांना अंतिम संधी देवून संबंधित कर्मचारी हे संगणकावर काम करण्यास सक्षम असल्यानंतरच त्यांचा पुढील मुदतवाढीसाठी विचार करण्यात येईल.

करिता, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53(3) च्या परंतुकान्वये उक्त कर्मचाऱ्यांना दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.05/05/2015 पासून पुढील सहा महिन्याकरिता तात्पुरती नियुक्ती देण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

श्री.गजानन बारवाल :वेळेवर मुदतवाढ,पगार दयायला पाहिजे हे सर्व कर्मचारी मनपामध्ये काम करतात का? काम करीत नसेल तर कार्यवाही सुध्दा केली पाहिजे.

मा.सभापती :काम करतात की नाही याची माहिती घेऊन मुदतवाढीचा प्रस्ताव सादर करतो का?

आस्थापना अधि.-1 :यात 30 कर्मचारी क.लिपीक आहे महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 53(3) अंतर्गत तात्पुरत्या नियुक्त्या देतो.संगणकाचे ज्ञान असणे गरजेचे आहे ते काम त्यांनी करावे ते यात नमूद केले आहे.मुदतवाढ देतांना विभागप्रमुखाकडून अहवाल मागवतो काहीचे अहवाल प्राप्त झाले नाही.

श्री.गजानन बारवाल :काही कर्मचारी लोकांच्या घरी काम करतात.असा आरोप माझा आहे.

मा.सभापती :यानुसार नेमलेले सर्व कर्मचारी काम मनपामध्ये करतात की नाही याची दक्षता घ्यावी.

श्री.रावसाहेब आमले :दैनिक वेतनावरील कर्मचा-यांना कायम करण्या संदर्भात शासनाने 11-5-2015 नुसार पत्र देऊन माहिती मागितली त्याचे उत्तर दिले नाही.असेच पत्र नागपूर मनपाला दिले त्यांनी माहिती देऊन तेथील कर्मचारी यांना सेवेत कायम करण्यात आले. रेग्युलर करण्यात आले.

आस्थापना अधि.-1 :या आठवडयात आकृतीबंध तयार होऊन स्थायी समिती समोर येईल आकृतीबंध तपासून हा प्रस्ताव सादर करावा असे म्हटले होते.आकृतीबंध तयार करण्याचे काम चालू आहे.

श्री.रावसाहेब आमले: तीन महिण्यापासून यांना पगार नाही मुदतीचा प्रस्ताव येण्यास वेळ का लागला.

आस्थापना अधि.-1 :विभाग प्रमुखाकडून अहवाल घेत असतो काहीचे अहवाल आले नाही.यानंतर मुदवाढीपुर्वी अहवाल घेतले जाईल.शासनाकडे कायम करण्यासाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

श्री.नितीन चित्ते :दिं.23-6-2009 ला ठराव घेतला की 34 शिक्षक तासिका बेसवर घ्यावे दोन महिण्यापासून त्यांना ऑर्डर नाही व पगारही नाही.शासनाचे पत्र आले की संच मान्यता घ्यावी म्हणून या बाबत पुढील कार्यवाही होत नाही याशिक्षकांनाही कामावर घेत नाही 34 पैकी आता 23 शिक्षक काम करतात.

शिक्षणाधिकारी :23 शिक्षक तासिका बेसवर काम करतात त्या व्यतिरिक्त 8,9,10 वी मान्यता घेतली त्यासाठी 23 शिक्षक असे एकूण 46 शिक्षक काम करतात.

श्री.नितिन चित्ते :शासनाचे पत्र की संच मान्यता घ्यावी व शिक्षक सेवक हे पदनाम भरावे.

शिक्षणाधिकारी : हा प्रस्ताव तयार केला आहे सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून शासनाकडे पाठवू.

श्री.नितीन चित्ते :शासन सुचना देते की 34 शिक्षक भरावे तरी त्यांना तासिका बेसवर घेतले 2 महिण्यापासून पेमेंन्ट नाही.23-6-2009 ला ठराव घेतला कार्यवाही होत नाही.जे वेतन त्यांना देतो तेच वेतन अनुदानीत करून शासनाने दिले असते.

शिक्षणाधिकारी :शिक्षक सेवक पदनाम मान्यता त्यानंतर अनुदानित तत्वावर मान्यतेसाठी पाठवावा लागेल.

मा.सभापती :2009 ला ठराव मंजूर झाला आतापर्यत कार्यवाही का झाली नाही.

शिक्षणाधिकारी :या पदाचा चार्ज घेवून मला पाच महिने झाले.

श्री.रावसाहेब आमले :पाच महिण्यात काय काम केले.सक्षम अधिकारी यांचेकडे चार्ज दयावा शिक्षण क्षेत्रात नुकसान होऊ नये.

श्री.नितिन चित्ते : शासनाने औरंगाबाद सह पिपंरी चिंचवड,पुणे ,नगर महापालिकेला पत्र दिले होते त्या मनपाने पदनाम पाठविले ते शिक्षक रूजू झाले त्यांचे वेतन शासन देत आहे या महापालिका प्रशासनाने प्रस्ताव पाठविला नाही त्या शिक्षकांचा तासिका बेसवरील पगार मनपास दयावा लागतो.तो ही दोन महिण्यापासून त्या शिक्षकांना आता वेतन नाही.

शिक्षणाधिकारी :या शिक्षकांचे पगार संदर्भात सचिंका कालच माझ्याकडे दाखल झाली. मा.आयुक्ताकडे पाठवायची आहे.

श्री.गजानन बारवाल :बन्सीलानगर येथील शाळेत शिक्षक दयावे.

श्री.रावसाहेब आमले :मिटमिटा येथील विदयार्थी संख्या चांगली आहे. आप्पाची वाडी भागात बालवाडी वर्ग सुरू करण्या संदर्भात मी दोन वेळेस पत्र दिले कार्यवाही होत नाही. 1000 लोकसंख्येचे गाव आहे शिक्षणाधिकारी यांची काम करण्याची इच्छा नाही दुसरे अधिकाऱ्याकडे चार्ज दयावा.

श्री.मोहन मेघावाले :उर्दू शाळा माझ्या वार्डात आहे 2-3 शिक्षक देण्यात यावे तसेच शाळेचे समिती अध्यक्ष कोण असावेत. शासनाचा काही जी आर आहे का ?

शिक्षणाधिकारी :वार्ड व शाळा कुठे आहे माहिती घेवून कार्यवाही केली जाईल.मिटमिटा येथील शाळेच्या संदर्भात प्रस्ताव पाठविला आहे.

श्री.मोहन मेघावाले :शिक्षणाधिकारी यांना वार्ड व सदस्यांचे नाव सुध्दा माहित नाही ते वेळेवर काम करीत नाही.

मा.सभापती :तासिक बेस वरील शिक्षकांचा प्रस्ताव 2009 मध्ये मंजूर असतांना शासनाकडे संच मान्यता व शिक्षक सेवक पदनाम मान्यतेसाठी का उशीर झाला याची चौकशी करून कार्यवाही करावी.

अति.आयुक्त :7 वी पर्यत शिक्षक हे कम्पसरी सेवेत येतात 8 ते 10 पर्यंचे शिक्षकासाठीचा खर्च मनपा फंडातून होतो.या शिक्षकाच्या पदनामास शासनाने काही अटी शर्ती घालून मंजूरी दिली असती शिक्षणाधिकारी पद भरले नाही अडचण होती.शिक्षण विभागा संबधीची कार्यवाही शासन स्तरावर केली जाईल शालेय समिती अध्यक्ष व सदस्य हे त्या वार्डाचे स.सदस्य असतात आता काही चेजेंस झाले असेल तर माहिती घेवून कार्यवाही होईल.

श्री.नितीन चित्ते :प्रत्येक बैठकीत उत्तर देतो दिले जाईल असे सांगण्यात येते मागिल चार बैठकीत प्रश्न केले त्यांचे उत्तर अदयाप मिळाले नाही.शासनाकडे संच मान्यतेसाठी का पाठविले नाही हे शिक्षक हवालदिल आहे दुसरा प्रश्न असा की 2015-16 पर्यत किती अधिकारी कर्मचारी निवृत्त होत आहे व किती निवृत्त झाले व पुढील नियोजन का होत नाही.कर्मचारी संख्या कमी असल्यामूळे सभागृहात निर्णय होतात अमलबजावणी होत नाही.या बाबत शहरातील नागरीकापर्यंत वेगळे मॅसेज जातात याची दखल घ्यावी.

शहर अभियंता :सभेचे ॲक्शन पॉईन्ट दिले तर माहिती तयार करता येईल.जे प्रश्न असतील दोन दिवस अगोदर सदस्यांनी पत्र देऊन माहिती विचारली तर देता येईलघेता येईल अचानक प्रश्न केला तर उत्तर उपलब्ध नसते.

श्री.गजानन बारवाल :पेपरला बातम्या येतात त्याची दखल घेतली पाहिजे.

श्री.मकरंद कुलकर्णी :आरोग्याच्या संबधीत तीन बैठकीपासून विषय चर्चेला येतो कार्यवाही होत नाही.

श्री.मेघावाले मोहन :फवारणी होत नाही जेंव्हा होते तेंव्हा सदस्यांना माहिती दिली पाहिजे.

मा.सभापती :जे प्रश्न असतील दोन दिवस अगोदर त्या विभागाकडे पत्र देऊन मागणी करावी.

श्री.रावसाहेब आमले :वार्ड 15 मध्ये डीपी रोड व आरक्षीत जागेच्या संदर्भात माहिती देणार होते पत्र दिले माहिती दिली नाही.

श्री.रेश्मा कुरैशी :माझ्या वार्डात अतिक्रमण झाले पत्र दिले कार्यवाही होत नाही.

श्री.अब्दुल नाईकवाडी :एन-4 विदयानगर हौ.सो.मधील एका प्लॉटवर सिडको प्रशासनाने सर्वे केला तेंव्हा येथील काम पुर्ण झालेचे दिसून आले.मनपाच्या सर्वेनुसार तेथे बांधकाम नाही.यात नेमके काय झाले माहिती दयावी.

मा.सभापती :विषय मंजूर. स.सदस्यांनी सुचना केल्यानुंसार जी रिक्त पदे आहे ते भरण्याची कार्यवाही करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे,महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील दैनिक वेतनावर कार्यरत असलेल्या अ.क्र.01 ते 60 प्रमाणे असलेल्या वर्ग-3 संवर्गातील कर्मचाऱ्यांना महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 53 (3) च्या परंतुकान्वये दोन दिवसाचा तांत्रिक खंड देवून दि.05/05/2015 पासून पुढील सहा महिन्याकरीता तात्पुरती नियुक्ती देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. 06 :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद मनपामार्फत प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांचे डीएनए बार्कोडींग करणेसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील पॉल हर्बर्ट सेंटर फॉर डीएनए बार्कोडींग अँड बायोडायव्हरसिटी स्टडीज् सेंटर व औरंगाबाद मनपामध्ये दिनांक 09/05/2011 रोजी सामंजस्य करार (MOU) करण्यात आला होता व या केंद्रामार्फत प्राणि संग्रहालयातील प्राण्यांचे अनुवंशीक आजार, जैव विविधता, मनपा हद्दीतील गोवंश हत्या प्रतिबंधक कायद्याचे अनुपालन इत्यादी बाबत डीएनए बार्कोडींगच्या माध्यमातुन संशोधन करण्यात येत आहे.

या संशोधनास अनुसरून महाराष्ट्र शासनाने माहे मार्च-2015 मध्ये लागु केलेल्या गोवंश हत्याबंदी विधेयकाच्या अंमलबजावणीसाठी डीएनए बार्कोडींग तंत्राचा वापर व उपयुक्तता या विषयावर यांनी संयुक्तपणे कॅनडा येथील गुलेफ युनिव्हरसिटी येथे भरणाऱ्या सहाव्या आंतरराष्ट्रीय परिषदेस शोध निबंध सादर केला होता. सदर परिषद दिनांक 18 ते 21 ऑगस्ट 2015 दरम्यान गुलेफ युनिव्हरसिटी, कॅनडा येथे भरणार असून सदर परिषदेत सादर केलेला शोध निबंध स्विकारण्यात आलेला आहे.

स्विकारण्यात आलेला शोध निबंध सादर करणेसाठी आंतरराष्ट्रीय परिषदेचे समन्वयक मेघ फ्रिटसे यांचा दिनांक 02 जुलै-2015 रोजी मेलद्वारे आमंत्रण प्राप्त झाले आहे.

सदरच्या परिषदेस उपस्थित राहणेसाठी प्रवासखर्च व परिषद नोंदणी फि प्रत्येकी अंदाजे रूपये एक लक्ष पंधरा हजार येणार आहे. तरी सदर परिषदेस उपस्थित राहण्याच्या मान्यतेस्तव व परिषदेस उपस्थित राहण्याच्या खर्चास मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल :या प्रस्तावात म्हटले की शोध निबंध अहवाल आयुक्त व संग्रहालयाचे संचालक संयुक्तपणे सादर करणार त्या बाबतीत खुलासा करावा.

श्री.नितीन चित्ते :असे कोणते संशोधन आहे की महापालिकेला त्याचा फायदा होऊ शकतो त्याची मनपास मदत होऊ शकते हे कशासाठी सादर करीत आहोत.

संचालक (पशुसवंर्धन ) :प्रत्येक सजिव प्रांणी वनस्पती हे पेशींनी बनलेले असते पेशीमध्ये मायकोपॉडरीया असते त्यात डीएनअे व आरएनअे असते या डीएनअेच्या स्टॅण्डमध्ये आडेनाईन, जायनीग,थॉयनींग आणी सायटोसी अशा लॅडर असतात त्यात जे गुणसुत्र असतांत तेच प्रेस करीत असतात.2011 साली जे विदयापीठातून संशोधन करतो त्याचा फिल्डवर काय वापर झाला पाहिजे त्या दृष्टीने करार करण्यात आला होता तेथे डीएनए बार्कोडींग सेंटर आहे व सिध्दार्थ उदयानमध्ये प्राणी संग्रहालय मनपा चालवते प्रांण्याचे डीएनअे बार्कोडींग करून घेऊन प्राण्यांचे जे अनुवंशीक आजार असतात ज्यामध्ये आयुष्य किती व त्यांना कुठला आजार, कालावधी व कोणत्या आजारास बळी पडू शकतात. प्रजनन चांगले होईल का त्या संशोधनासाठी डीएनए बार्कोडींगचे तत्रं अतिशय उपयुक्त असल्यामूळे विदयापीठासोबत 2011 साली तयार केले त्या संबधीचा करार केलेला होता.या संशोधनाचे रिजल्ट आले होते ते मा.आयुक्तांना दाखविले होते.

श्री.गजानन बारवाल :गोवंश हत्याबंदी उल्लेख केला त्याचा काय संबध येतो.

संचालक पशुसंवर्धन :शासनाने मार्च 2015 मध्ये गोवंश हत्याबंदी लागू केली.गुन्हे दाखल होत आहे.मांस जप्त केले जाते. ते बैलाचे की म्हसीचे की गायीचे व किती वयाचे हे डीएनअे बार्कोडींग मार्फत समजते असे सॅम्पल अनलाईज करण्यासाठी सेंन्टरला रिसर्स पेपर त्या विदयापीठाकडे दिले ते मान्य झाले.

श्री.नितीन चित्ते :पशुपक्षी कडे जसे लक्ष आहे त्याप्रमाणे शहरातील नागरीकांच्या आरोग्या विषयी प्रशासनाने काळजी घ्यावी.

मा.सभापती :विषय मंजूर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद मनपामार्फत प्राणिसंग्रहालयातील प्राण्यांचे डीएनए बार्कोडींग करणेसाठी कॅनडा येथील गुलेफ युनिव्हरसिटी कॅनडा येथे दिनांक 18 ते 21 ऑगस्ट 2015 दरम्यान भरणाऱ्या सहाव्या आंतरराष्ट्रीय परिषदेस उपस्थित राहणेसाठी औरंगाबाद महानगरपालिकेचे आयुक्त श्री.पी.एम.महाजन व मनपा प्राणि संग्रहालयाचे संचालक डॉ.बी.एस.नाईकवाडे यांच्या प्रवासखर्च व परिषद नोंदणी फि प्रत्येकी अंदाजे रूपये एक लक्ष पंधरा हजार व सदर परिषदेस त्यांनी उपस्थित राहण्यास तसेच परिषदेस उपस्थित राहण्याच्या खर्चासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबर राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी घोषित केले.

**(दिलीप सुर्यवंशी)**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद